प्रकरण क्र. : ३५९/पीडब्ल्यू/२०१४
निशाणी क्र.: ६

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी.</u>**

**<u>मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की</u>** :—

**नाव : नैनेश महेंद्र शहा.**

**वय : ४२ वर्ष.**

**व्यवसाय : खाजगी नोकरी**

**राहणार : मिरारोड, सेक्टर—२, सी—२०१, शांतीनगर, मिरारोड, ठाणे**

**<u>अभियोग पक्षाचा पुरावा सरकारी वकील किशोर पाटील यांच्या तर्फे:</u>**

सन २०१३ मध्ये मी गहना ज्वेलर्स, बांद्रा पश्चिम येथे कामाला होतो. सदर दुकानामध्ये आम्ही कारागीरला सोने देत होतो, सॅम्पल देत होतो व ऑर्डर प्रमाणे कारागीर कडून ज्वेलरी बनवून घेत होतो. आमचे दुकानामध्ये आब्बासअली हा दागिन्याचे काम करण्यासाठी कारागीर म्हणून येत होता. ग्राहकांनी दिलेल्या ऑर्डर प्रमाणे मी त्याला सोने देत होतो व त्याप्रमाणे त्याचेकडून ज्वेलरी बनवून घेत होतो. आमचे दुकानाच्या दोन गल्ल्या सोडून अब्बासअलीचा सोने ज्वेलरी बनविण्याचा कारखाना होता. आम्ही डिसेंबर २०१२ पासून ते सन २०१३ पर्यंत सोने आणि ऑर्डर प्रमाणे सॅम्पल ज्वेलरी बनविण्यासाठी दिले होते. जवळपास ८१० ग्रॅमच्या जवळपास सोने व २४५ ग्रॅम सॅम्पल त्याला ज्वेलरी बनविण्यासाठी दिले होते.

२. दिनांक २४.०१.२०१३ रोजी मी अब्बासअलीला दुपारच्या वेळेस ज्वेलरी तयार झाली का असे विचारण्यासाठी त्याच्या मोबाईलवर फोन केला होता. त्यावेळी त्याचा फोन लागला नाही. त्यानंतर मी त्याचा कारागीर लाल्टू याला मोबाईलवर फोन केला. लाल्टूने सांगितले की दागिने तयार झाले असतील तर मिळतील. आब्बासअली सोबत संपर्क न झाल्यामूळे आमच्या दुकानातील शिपाई सिंकदर याला आब्बासअलीच्या कारखान्यामध्ये ज्वेलरी

तयार झाली का याबाबत विचारायला पाठविले. त्यावेळी सिकंदर याला न मिळाल्यामूळे ते परत आले. त्यानंतर मी आणि सिकंदर आब्बासअलीच्या घरी नालासोपारा येथे गेलो. तो त्याच्या घरी भेटला नाही आणि त्याचा मोबाईल सुध्दा बंद होता. त्यावेळी आम्हाला वाटले की, आब्बासअली हा त्याला ज्वेलरी बनविण्यासाठी दिलेले सोने व सॅम्पल घेवून कोठेतरी निघून गेला. म्हणून आम्ही बांद्रा पोलीस स्टेशन येथे तक्रार देण्यासाठी गेलो. अब्बासअली याला २४ कॅरेटचे जवळपास ८११ ग्रॅमचे सोने दिले होते व सॅम्पल जवळपास २४५ ग्रॅमचे दिले होते, असा एकूण ३५लाखाच्या जवळपास सोने व सॅम्पल दागिने बनविण्यासाठी दिले होते.

३. आता मला पोलीस स्टेशनला दिलेली तक्रार दाखविली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. तक्रारीस **निशाणी क्र—७** देण्यात येतो. मला आता मी आब्बासअलीला दिलेले सोने व सॅम्पल दाखविल्यास भरपूर कालावधी उलटल्यामूळे मी ओळखू शकणार नाही. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. तो आज न्यायालयात उपस्थित आहे.

**<u>उलट तपास आरोपी करिता वकिल ए. आर. शेख यांचे तर्फे:</u>**

४. आमचे ज्वेलरी शॉप बांद्राच्या पॉश एरियामध्ये आहे. त्यामूळे तेथे ग्राहक सूध्दा तसेच येतात. ग्राहक युनिक डिझाईनची मागणी करत असत. त्यामूळे तसे आमच्या शॉपमध्ये सोने दागिणे घडविता येत नव्हते. त्यामूळे आम्हाला एक्सपर्ट व एक्सपिरिएन्स कारागीरांची गरज लागत होती. हे म्हणणे खरे आहे की आमचे दुकानात साधारण कारागीर काम करू शकत नाही. आब्बासअली यांनी आम्हाला विनंती केली की त्याला एक चान्स द्या म्हणून आम्ही त्याला काम दिले. मला तारीख आठवत नाही, परंतू डिसेंबर २०१२ मध्ये आम्ही अब्बासअली याला पहिल्यांदा काम दिले होते. आम्ही जेव्हा काम देतो तेव्हा आम्ही व्हॉवचर देतो. मला आता आठवत नाही की जेव्हा मी

पोलीस स्टेशनला तक्रार दिली तेव्हा मी व्हॉवचर पोलीसांना दिले होते किंवा नाही. आम्ही जेव्हा कारागीरला सोने देतो तेव्हा त्यासोबत आम्ही सोने २४ कॅरेट आहे याचे सर्टिफिकेट देत नाही. तसेच कारागीर जेव्हा दागिने बनवून देतो तेव्हा आम्ही त्याचेकडून प्युरिटी सर्टिफिकेट घेत नाही.

५. मला आता आठवत नाही की आम्ही जे सोने व सॅम्पल आब्बासअलीला दागिने बनविण्यासाठी दिले होते ते कोणत्या ग्राहकाने ऑर्डर केले होते. हे म्हणणे खरे नाही की, शॉपच्या मालकाला कोणाला काय ऑर्डर दिली हे वैयक्तिकरित्या माहित नसते. हे म्हणणे खरे आहे की, दुकान मालकाने मला लिखीत स्वरूपात तक्रार दाखल करण्याबाबत काही अधिकार दिले नाही. हे खरे आहे की, मी तक्रार दिली तेव्हा मी त्या दुकानामध्ये काम करत होतो याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, व्हॉवचरवर माझी सही आहे. हे म्हणणे खरे आहे की, सन २०१२ च्या आधी आम्ही आरोपी आब्बासअली याला दागिने बनविण्याचे काम दिले नव्हते.

६. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा चांगला कारागीर होत व आरोपीने आमचे दुकानामध्ये काम सोडून दिल्यामूळे त्याच्यावर प्रेशर आणण्यासाठी आम्ही तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, एफआयआर मध्ये नमूद सोन व सॅम्पलशी आरोपीचा काही संबंध नाही.

उलट तपास पूर्ण. पुर्न:तपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृती,

Digitally signed by RAJU TUKARAM INGLE
Date: 2026.07.15 15:00:23 +0530

(आर. टी. इंगळे)
न्याय दंडाधिकारी (प्रथम वर्ग),
१२ वे न्यायालय,बांद्रा, मुंबई.

दि. १५/०७/२०२६
ठिकाण :— मुंबई